अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४३५ ठ. क्र. ३८ दि. १२-५-१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र.२१ मधील व्हिवको प्रोसेस जवळ जे महालक्ष्मीचे मंदिर आहे. ते साधारणपणे गेल्या २० ते २५ वर्षापूर्वीचे जुने मंदीर आहे. शहर व जिल्हयातील अनेक भावीक दर्शनाला येत असतात. तेव्हा ज्या चौकात सदरील श्री महालक्ष्मीचे मंदीर आहे त्या चौकास **श्री महालक्ष्मी चौक** असे नांव देणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 36 ठ. क्र. 35 दि. 12-5-16 रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरचा भुईकोट किल्ला हे सोलापूरची शान आहे. सोलापूर महानगरपालिकेने केंद्र शासनाकडून सदर किल्ला भाडेतत्वावर घेतले आहे. सोलापूर किल्ला आदिलशाही असून, अहमदनगरचे निमाजशहाची कन्या **राणी चॉंदबीबी सुलतान** यांचा विवाह ५ वे हुकमरा अबुल मुजफ्फर अली आदिलशहा यांचेबरोबर सोलापूर येथे सन १५६४ चे काळात सोलापूरचे किल्यात विवाह संपन्न झाला व विवाह निमित्ताने सदरचा किल्ला राणी चॉंदबीबी सुलतान यांना (दहेज) अणदंड म्हणून दिले आहे. सदरचा इतिहास नष्ट होवू नये म्हणून सोलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.रुस्तुम कंपली व श्री.भिमाशंकर दर्गोपाटील यांनी किल्यातील बाल उद्यानास राणी चॉंदबीबी सुलतान उद्यान असे नांव देण्यास पत्रकार परिषद घेऊन जाहिर मागणी केली आहे. तरी इतिहास आबादित रहावे म्हणून किल्यातील बाल उद्यानास **राणी चॉंदबीबी सुलतान उद्यान** असे नामकरण करण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४३४ ठ. क्र. ३६ दि. १२-५-१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्रं.२० अ मधील सुनिल नगर ते कलावती नगर जाणा-या रस्त्यास **ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग** असे नामकरण करुन नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४३८ ठ. क्र. ३५
दि. १२-५-१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

४३८

प्रभाग क्र. २० अ मधील बनशंकरी हॉटेल ते विनायक नगरकडे जाणा-या रस्त्यास **हनुमान चौक** असे नामकरण करुन नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४३९ ठ. क्र. ३८
दि. २२-५-१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र.२० अ मधील कलावती नगर ते म्हेत्रे नगरकडे जाणा-या मार्गास **आहिल्याबाई होळकर मार्ग** असे नामकरण करुन नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ... ठ. क्र. ३६ दि. १२/५/१६ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्रं. २० अ मधील आशा नगर प्रिसिजन कंपनीपासून ते ए-वन बेकरीपर्यंतच्या रस्त्यास **बसवेश्वर चौक** असे नामकरण करुन नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ...... ठ. क्र. ...... दि. ......... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय विविध स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था संचलीत राजमाता जिजाऊ मध्यवर्ती महामंडळ सोलापूर ही रजिष्टर्ड संस्था आहे. त्याचा नंबर एसयुआर/जीएनएल/०/१०५ असा आहे. राजमाता जिजाऊ मध्यवर्ती महामंडळामार्फत विविध सामाजिक, शैक्षणिक, व्यसनमुक्तीचे मेळावे भरविणे, विविध आरोग्य शिबीराचे आयोजन करणे, असे विविध समाजोपयोगी कार्य केले जाते. सदरील संस्था ही समाजात जातीय सलोखा निर्माण करण्याचे सामाजिक कार्य करीत असते. तरी सोलापूर महानगरपालिकेकडून जशी इतर महामंडळास अनुदान/आर्थिक मदत केली जाते. त्याच पध्दतीने उपरोक्त नमूद संस्थेस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम साजरा करणेसाठी र.रु. ७५,०००/- चे अनुदान देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ४५१ ठ. क्र. ८६१
दि. १२/५/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १६ अ मध्ये महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नटराज तमाशा थिएटर ते अक्कलकोट नाका कमला बँकेमार्फत (गवईपेठ, २५६ गाळा, गांधीनगर झोपडपट्टी नं. ६,५,४,३,२,१ व ओपन प्लॉट) ड्रेनेज लाईन घालणेचे काम मंजूर असून, त्याचे अंदाजित पूर्वगणनपत्रक र.रु. १.९६ कोटी आहे. त्यापैकी आजला र.रु. ३०.०० लाखापर्यंतचे काम पूर्ण झालेले आहे. सध्या याठिकाणी अर्धवट कामामुळे अनेकांना गैरसोय होत आहे. सध्या पावसाळा लवकरच सुरु होणार असल्याने तेथे औद्योगिक वसाहत मोठया प्रमाणात असल्याने सांडपाण्याचा निचरा होणेसाठी याठिकाणी या योजनेतील पुढील ड्रेनेज लाईन घालणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी उर्वरीत रक्कम या योजनेतून उपलब्ध करुन सदरचे काम युध्दपातळीवर सुरु करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा...४५३..ठ. क्र.....०२....
दि..१२/५/१८........ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. भागवत तुकाराम कदम हे वाहक या पदावर परिवहन विभागाकडे दि.१०-४-१९८७ पासून कायम सेवक म्हणून कार्यरत होते. दि.२५-५-२०१३ रोजी ३ प्रवाशांना तिकिट रिइश्यु केल्याचा रिपोर्ट उपक्रमाकडील वाहतुक निरिक्षकांनी परिवहन व्यवस्थापकाकडे दिल्याने त्यांनी चौकशी करुन बडतर्फ केले. सदरचे झालेले वर्तन हे त्यांची मनस्थिती ठीक नसल्याने, व अनावधानाने झालेली असून ते वाहक या पदी कामावर लागल्यापासून ते दि.२५-५-१३ च्या याघटनेपर्यंतचे कामकाज पाहता अत्यंत प्रामाणिकपणे व व्यवस्थितपणे सेवा बजावलेली आहे. याचा विचार करता, व त्यांनी केलेल्या चुकीबद्दल त्यांना शिक्षाही देण्यात आलेली असून, त्यांचे कुटूंबियांचा विचार करता व त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने, एकवेळ त्यांना माफी करुन, पुन्हा कामावर घेण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.४५० दि.२७/५/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव क्र. ८३ बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४९ ब मधील सि.स.नं. १२३/२/२ जुळे सोलापूर या भागातील बालाजी मंगल कार्यालय ते पिताश्री अपार्टमेंट पर्यंत १५ मिटर रस्त्यास **कै. सिद्रामप्पा रायप्पा बंडे मार्ग** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस, येणा-या खर्चास मान्यता देणे तसेच प्र.क्र. ४९ ब मधील सि.स.नं.१२३/२/२ ड सिध्दीविनायक गृहसंकुल ते ओल्ड आयएमएस स्कूल कॉर्नरपर्यंतच्या रस्त्यास (बारा मिटर रस्त्यास) **कै. श्रीमती सिध्दव्वाबाई सिद्रामप्पा बंडे मार्ग** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस, येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.४५५ ठ. क्र.७७
दि.१२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

४५५

प्रभाग क्र. २६ सहयाद्री शॉपिंग सेंटर व इंद्रप्रस्त मंगलकार्यालयाच्यामध्ये असलेले मनपाच्या जागेमध्ये रेल्वे लाईन सर्व्हे नं. ८३७१ पैकी जागेमध्ये शासनामार्फत महानगरपालिकेच्या मालकीचे जागेवर समाज मंदिर बांधून देण्यात आलेले आहे. सदरचे जागा एकता मित्र मंडळ बहुउद्देशीय सामाजिक संस्था असे मान्यता प्राप्त असून, त्याचे प्रामुख्याने कार्य म्हणजे तळागाळयात लोकांना प्रोत्साहन देणे विविध प्रकारचे मदत करणे खास करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवाजी महाराज जयंती, थोर राष्ट्रीय महापुरुष विविध सांस्कृतिक कार्यक्रम हाती घेण्यात येते. परंतू जागेअभावी फारच कुचंबणा होत आहे. तरी सदरचे समाज मंदिर एकता मित्र मंडळ बहुउद्देशीय सामाजिक संस्था या संस्थेस नियमानुसार २९ वर्षे ११ महिने प्रचलित नियमानुसार भाडयाने देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज४४८ ठ. क्र. ८५ दि. १२/५/१९६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विजापूर रोडवर भारती विद्यापीठकडे जाणारा रस्ता विजापूरकडे जाणारा रस्ता व अशोक नगर कडे जाणारा रस्ता व सोलापूरकडे जाणारा रस्ता झालेल्या चौकास संत रोहीदास चौक असे नामकरण करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका